| | | | |
|---|---|---|---|
| <?xml version="1.0" ?> | | | |
| <?xml-stylesheet type="text/css" href="home.css"?> | | | |
| <Doc id="mar-w-media- | MA00002 | " | lang="Marathi"> |
| <Header type="text"> | | | |
| <encodingDesc> | | | |
| <projectDesc> | CIIL-Multilingual parallel text corpora | | </projectDesc> |
| <samplingDesc> | Simple written text only has been transcribed. Diagrams, pictures, tables and verses have been omitted. Samples taken from page 10, 20, 30, 40, 60, 50, 70, 80, 90, 100 | | </samplingDesc> |
| </encodingDesc> | | | |
| <sourceDesc><br><biblStruct><br><source> | | | |
| | <category> | Aesthetics | </category> |
| | <subcategory> | Literature-Novels | </subcategory> |
| | <text> | Book | </text> |
| | <title> | Agantuka | </title> |
| | <vol> | | </vol> |
| | <issue> | | </issue> |
| </source> | | | |
| <textDes> | | | |
| | <type> | | </type> |
| | <headline> | | </headline> |
| | <author> | dhIrubahEna paTEla | </author> |
| | <translator> | suSamA karOgala | </translator> |
| | <words> | 3125 | </words> |
| </textDes> | | | |
| <imprint> | | | |
| | <pubPlace> | India-New Delhi | </pubPlace> |
| | <publisher> | sAhitya akAdamI | </publisher> |
| | <pubDate> | 2005 | </pubDate> |
| </imprint> | | | |
| <idno type="CIIL code"> | | 88440 | </idno> |
| <index> | | MA00002 | </index> |
| </biblStruct><br></sourceDesc> | | | |
| <profileDesc><br><creation> | | | |
| | <date> | 18-Aug-2009 | </date> |
| | <inputter> | H.S.Rupa | </inputter> |
| | <proof> | Supriya Shetty | </proof> |
| </creation> | | | |
| <langUsage> | | Marathi | </langUsage> |
| <wsdUsage> | | | |
| <writingSystem id="ISO/IEC 10646">Universal Multiple-Octet Coded Character Set (UCS).<br></writingSystem> | | | |
| </wsdUsage> | | | |
| <textClass> | | | |
| <channel mode="w"> | | print | </channel> |
| <domain type="public"> | | | </domain> |
| </textClass> | | | |

| | | |
|---|---|---|
| </profileDesc><br></Header> | | |
| <text><body> | | |
| <p> | परंतु ईशाननं दरवाजावर थाप मारायला आलेल्या सीतारामला, 'मी दोन वेळेला जेवत नाही.' असं आतूनच सांगून टाकलं. | </p> |
| <p> | ड्रॉईंगरूममध्ये बसलेल्या तिघांनी एकदुसऱ्याकंड अर्थपूर्ण दृष्टी टाकली. कारण की हा मामला चालू दे असंच कसंतरी असा नव्हताच काही. म्हणून मग शेवटी आशुतोषनं म्हटलं, 'चला मग आताच बोलून घेऊ या.' | </p> |
| <p> | त्यांच्या मागोमाग अर्णवही उठून उभा झाला आणि त्यानं रीमाच्या पाठीवर हात ठेवत म्हटलं, 'चला नं, भाभी तुम्हीही!' | </p> |
| <p> | 'नको बाबा, मला यात पडायचंच नाहीये मुळी!' | </p> |
| <p> | दोघंही ईशानच्या खोलीसमोर जाऊन उभे राहिले. आशुतोषनं जरासा दरवाजा खटखटवला; तेवढ्यात ईशाननं तो उघडला. अर्णवही समोरच उभा असलेला पाहून तो लगेच बाजूला सरकला आणि त्यानं दोघांना आत यायची जागा करून दिली; मग सावकाश म्हटलं, 'या नं!' | </p> |
| <p> | अर्णव इकडेतिकडे बघत सोफ्यावर बसला. आशुतोष त्याच्या बाजूलाच बसला. ईशान समोर उभा होताच. | </p> |
| <p> | 'बस ना!' | </p> |
| <p> | 'नको, असा बराय् मी!' | </p> |
| <p> | बोलणं सुरू करायचं होतं, पण काही सुधरत नव्हतं. शेवटी अर्णवची वाचाळता मदतीला आली. त्यानं म्हटलं, 'तुमच्या उत्तर काशीमध्ये आता थंडी असेल, नाही का?' | </p> |
| <p> | 'हो.' | </p> |
| <p> | 'इथं मात्र सॉलिड उकडतंय्. आशुभाई तुम्ही या रूमला ए. सी. लावला नाहीत, नाही का?' | </p> |
| <p> | आशुतोषनं नापसंतीनं अर्णवकडं पाहिलं. त्याला असा आगाऊपणा अजिबात आवडला नाही. तरीही त्यानं उत्तर दिलं, 'ही रूम खास वापरली जात नाही ना!' | </p> |
| <p> | 'हां, हे मात्र खरं, आणि बसवला तर आपला सीतारामच द्यायचा ताणून झक्कपैकी!' | </p> |
| <p> | 'ठीकेय आता! असाही तो दुपारी झोपत असतोच.' | </p> |
| <p> | 'पण जरासं थंड असेल तर जास्त झोप. मग मागाहून रीमाभाभी चिडणार.' | </p> |
| <p> | मौन! तलावाच्या तळाशी जमलेल्या खाजणाच्या गच्चपणासारखं मौन. आशुतोषला खूप बेचैन वाटायला लागलं, अन् त्यानं तिखट नजरेनं अर्णवकडं पाहिलं. अर्णव खाकरत-खोकत उभा झाला आणि खिडकीजवळ जाऊन बाहेर बघत म्हणाला, 'इथून व्ह्यू फारच सुंदर दिसतोय्, हो ना? आवडला ना?' | </p> |
| <p> | ईशाननं मनात आणलं असतं तर तो या दोघांना मदत करू शकला असता. या लोकांना काय विचाराचंय्, त्यांना कसली काळजी आहे, हे तो जाणून होता. तरीही तो मूक राहिला. पुढं होऊन त्यांचा हात धरणयाची लेशमात्र इच्छा त्याला झाली नाही. परत आणखी म्हणजे त्याचं उत्तरही तयार नव्हतं. | </p> |
| <p> | आशुतोषनं खोलवर डोकावत पाहिलं, पण ईशान तिरकसपणानं बोलत नव्हता. फक्त एक | </p> |

| | | |
|---|---|---|
| | वस्तुस्थिती, हकिकत सांगत होता. कसल्याही पश्चातापाशिवाय. अजब माणूस होता हा त्याचा भाऊ ईशान. | |
| <p> | ‘आता मला तुम्हाला फक्त इतकंच विचारायचंय की, मला काही कामकाज मिळालं तर, तुम्ही सांगाल ना, की तुम्ही मला ओळखता, आणि बी.ए.ही पास झालोय, असं?’ | </p> |
| <p> | ‘हां, त्याला काही हरकत नाही. पण ईशान तू आता इथं कायमचं राहायचं असं ठरवलं आहेस?’ | </p> |
| <p> | ‘इथं म्हणजे या घरात नाही. कदाचित या शहरात, थोडा काळ.’ | </p> |
| <p> | ‘म्हणजे तू नोकरी करशील?’ | </p> |
| <p> | ‘पाहू, मिळाली तर.’ | </p> |
| <p> | ‘ओ, हो, ईशान! तुला जमेल?’ | </p> |
| <p> | ‘पाहू यात.’ असं म्हणून ईशान विचारात गढून गेला. आशुतोष पेपर वाचता वाचता, घटकेघटकेला त्याच्याकडे पाहत होता. त्याचा चेहरा वाचून जणू काही त्याचं गूढ तो उकलू शकणार होता! | </p> |
| <p> | थोड्या वेळानं नाइटगाऊन घातलेली रीमा आली. तिचा चेहरा थकलेला होता; अन् केस विस्कटलेले होते. आल्याआल्याच ती खुर्चीत धस्सकन बसली आणि दोन्ही भावांकडं साशंक नजरेनं पाहायला लागली. आपला चहा कपात ओतता ओतता उगाच आपलं विचारायचं म्हणून तिनं विचारलं, ‘रात्री झोप नीट लागली ना, ईशानभाई?’ | </p> |
| <p> | ‘हो... मी थोडा वेळ बाहेर जाऊन येऊ का?’ ईशाननं आशुतोषला विचारलं. आशुतोषनं रीमाकडं पाहयलं, तिच्या नजरेत नकार दिसत होता, पण ईशानला नाही कसं म्हणावं, ते आशुतोषला लगेच सुचलं नाही. इतक्यात ईशान उठलादेखील. | </p> |
| <p> | ‘पार उशीर करू नकोस. उगाचच सगळ्यांना नस्ती काळजी.’ | </p> |
| <p> | ‘एखाद्या तासात येईन परत.’ | </p> |
| <p> | ‘बरंय.’ असं म्हणत आशुतोष पेपर वाचायला लागला. ईशान गेल्याची खात्री झाल्यावर रीमानं मनातल्या मनात धुमसत म्हटलं, | </p> |
| <p> | ‘नाही म्हणाला असतात तर?’ | </p> |
| <p> | ‘असं नाही कसं म्हणायचं?’ | </p> |
| <p> | ‘वेळेत परतले नाही म्हणजे?’ | </p> |
| <p> | आशुतोषनं एक उसासा सोडला. समजा असं झालं तरी इथं कुणाच्या डोक्यावर आभाळ कोसळणार आहे? रीमा तर निश्चिन्त होईल उलट. आशुतोषच्या मिळकतीत तिला कुणाचा वाटा नकोय. ईशानविषयीचा आपला नावडतीचा भाव लपविण्याचा तिनं अजिबात प्रयत्न केला नव्हता. तरीही आता उगाच वरवर काळजी करतेय - कशासाठी काय माहितेय! | </p> |
| <p> | ‘तू इतकं सगळं लिहितो आहेस तर मग तुला संस्कृत किंवा अशाच कशाची तरी ट्यूशन करायला जमणार नाही का?’ | </p> |
| <p> | ‘जमेल; पण मुलं संस्कृत शिकतात का आता?’ | </p> |
| <p> | ‘शिकत असतील, आपण विचारून बघू ना. तुझी काही हरकत नाही ना?’ | </p> |
| <p> | ‘अजिबात नाही. दुसऱ्या कुठल्या नोकरीपेक्षा हे बरं. दोन-अडीचशे मिळाले तरी काम भागेल.’ | </p> |

| | | |
|---|---|---|
| <p> | आता मात्र आशुतोषला खूप हसू आलं. हसता हसता तो म्हणाला, 'ईशान! हे १९९५ साल चाललंय. ध्यानात येतंय का तुझ्या? हा आपला सीताराम आहे ना, त्याचा पगार कितीय माहितीय?' असं म्हणून त्यानं एक बोट उंच केलं. | </p> |
| <p> | 'शंभर?' | </p> |
| <p> | 'शंभर नाही. हजार; आणि परत वर तो महागाई आणि पगारवाढ याबाबत बोलतच असतो.' | </p> |
| <p> | 'ओह! पण त्याचा कुटुंब परिवार असेल ना? मला एक वेळच्या भोजनाखेरीज कशाची कशाची गरजय्?' | </p> |
| <p> | 'तुला दोन जोड कपड्याची गरज नाही? आजारीबिजारी पडलास तर औषधपाणी नको? डोक्यावर छपराची गरज नाही? ही पुस्तकं आणि कागद, पेन फुकट का येतं? जिवंत माणसाला काय लागत नाही, ईशान? तुला काही कळत नाही.' | </p> |
| <p> | 'हं.' | </p> |
| <p> | 'बरं मग. आता सांग तुझ्या आश्रमाबद्दल. काय झालं होतं तिथं?' | </p> |
| <p> | ईशानच्या डोळ्यासमोर उत्तरकाशीचा आश्रम साकार झाला. पहाटे पहाटे सूर्योदय होण्याआधीच बर्फासारख्या शीतल गंगाजलात डुबक्या मारीत केलेलं स्नान. अहाहा.... त्या स्नानाशिवाय देहमनाला शांती कुठून मिळणार? अंगावरलं कातडं गोठून जायचं नाही, दाह व्हायचा, पण आतून कुठूनतरी अनोख्या चेतनेचं कारंजं जागचं व्हायचं.... वाटायचं की ब्रह्मांडाच रहस्य वीतभर हातावरच तर आहे. आसपासची माणसं, त्यांचं बोलणंचालणं सगळं दूर दूर सारलं जायचं. मनाच्या एकांतात ईशान आदित्याला आवाहन करायचा. गंगातटावर पद्मासन घालून पूर्वादिशाभिमुख होत तो सूर्याचं चिंतन करायचा. गायत्री मंत्राचं उच्चारण करायचा आणि त्याच्या परमतेजानं आपली बुद्धी प्रकाशमान होवो, तत्व ग्रहण करण्याइतकी सूक्ष्म आणि निर्मळ बनो अशी प्रार्थना करायचा; मग आश्रमात जाऊन गुरुदेवांचा उपदेश ग्रहण करायचा, आणि त्यानंतर एकामागोमाग येणाऱ्या आज्ञांच्या पालनात धन्यतेचा अनुभव घ्यायचा. | </p> |
| <p> | माध्यान्हीच्या भोजनात बहुतकरून जाड रोटल्या आणि डाळ असायची. त्या त्या वेळेस जी भाजी स्वस्त असायची ती खायची. एकदा तर लागोपाठ दोन महिने एकाच तऱ्हेची पहाडी भाजी मिळाली होती. गुरुदेव आनंदाने जेवायचे. सगळ्यांबरोबर, सगळ्यांसारखंच. मग कोण कुणाची तक्रार करील? | </p> |
| <p> | 'आशुभाई! अर्णव बोलतोय.' | </p> |
| <p> | 'हां, कसं आहे?' | </p> |
| <p> | 'ओ. के., पण आज पंड्याचा फोन आला होता.' | </p> |
| <p> | 'कोण पंड्या?' | </p> |
| <p> | 'तो, आपण नव्हता का पाठवला? मी सांगितलं नव्हतं का, की फार स्मार्ट माणूस आहे, सगळा तपास लावेल.' | </p> |
| <p> | 'हं!' | </p> |
| <p> | 'त्यानं आज फोन केला होता.' | </p> |
| <p> | 'इथं यायचं काय झालं?' | </p> |

| | | |
|---|---|---|
| <p> | 'अरेच्च्या, तुम्ही ऐका तर खरं. हे आपले भाऊसाहेब काही साधेसुधे नाहीयेत. पंड्या तर थेट त्याच्या हेडलाच भेटून आला. कुणी प्रतापगिरी महाराज आहे. त्यांनी काही फार चांगला रिपोर्ट दिलेला नाही. म्हणताहेत की, खरं तर त्याला काढून टाकल्यागतच आहे.' | </p> |
| <p> | 'वॉट नॉन्सेस! मला ईशाननं सगळं सांगितलंय. हा मूर्ख आपणहून तिथून निघून आला आहे.' | </p> |
| <p> | 'मला नाही पटत.' | </p> |
| <p> | 'का? तुझ्या त्या पंड्यानं काही स्कॅन्डल शोधून काढलं आहे की काय?' | </p> |
| <p> | 'अं... स्कॅन्डलसारखं नाही, पण सांगतोय की काही प्रॉपर्टी मिसिंग आहे... रेकॉर्डस मेनली. मला तर असं वाटतंय की, आपण ईशानला एकदा तिथं घेऊन जावं आणि समोरासमोर सगळं क्लीअर करून टाकावं, मागाहून आपल्याला कसलीही पिडा नकोय... तुम्हाला काय वाटतंय?' | </p> |
| <p> | 'मला वाटतंय की आता आपण झोपायला जावं. गुड नाईट!' | </p> |
| <p> | 'पण आशुभाई...!' | </p> |
| <p> | 'उद्या बोलू.' असं म्हणून आशुतोषनं फोन ठेवून दिला. | </p> |
| <p> | 'कोण होतं?' रीमानं विचारलं. तिला चांगलंय माहीत होतं की कोण होतं, अन काय बोलणं चाललं होतं, तरीही तिनं प्रश्न विचारला. हा प्रश्न खरं म्हणजे तर एक निमित्त होतं, ईशानचा विषय काढण्याचं, आणि आशुतोषला याविषयी आता काहीही बोलायचं नव्हतं. रीमाशी तर मुळीच नाही. तो खरंच फार थकला होता आणि त्याला ईशानची चीड आली होती. मोठा शहीद व्हायला निघाला! प्रतापगिरीला ओब्लाईज केलं, पण त्या कीर्तीच्या बदल्यात त्यानं काय केलं तर, जोडे हाणले ना! अजून काय होणार आहे, कोण जाणे! बिचारा टाईपिस्ट होऊनतरी दिवस काढतो का नाही! | </p> |
| <p> | 'का, बोलला नाहीत ते! अर्णवभाई होते ना?' | </p> |
| <p> | 'हं,' असं म्हणत आशुतोष अंथरुणावर पडला. भिंतीकडं कुशीवर वळता वळता सावकाश म्हणाला, 'तू झोप, सकाळी बोलू या.' | </p> |
| <p> | कुणी वापरत नसलेल्या त्या खोलीत आता ईशान राहणार होता. गालिचा थोडासा दुमडून जागा करून घ्यायला पाहिजे, म्हणजे मग झोपण्यासाठी चादर अंथरता येईल. बाकीचं चालवून घ्यायचं. सामानही जरा एवढंस. ते लावायला किती वेळ लागणार? मग खिडकीपाशी जाऊन त्यानं डोकावून पाहिलं, ह्या अकराव्या मजल्यावरनं कुठलंही झाड उंच दिसत नव्हतं. सगळी झाडं लहान लहान आणि खाली. आपण सगळ्यांच्याही वर. पार विचित्र वाटत होतं. पक्षीबिक्षी नजरेसदेखील पडत नव्हते. फक्त आकाश. त्यातही वारंसुद्धा एका जागी थांबलेलं, स्थिर, जणू काही झिरझिरीत तरल निळसर पडदा समोर सोडून सूत्रधार लपून बसला असावा. वाट पाहत राहयची की, केव्हा कुठं गती दिसतेय. हालचाल जाणवतेय, त्याची... अचानक त्याच्या लक्षात आलं की, इप्सितला आपण नीट उत्तर दिलं नाही, हे बरं झालं का? ती आनंदविभोर होत आपल्याला न्यायला आली होती. आपण म्हणालो असतो तर बायबलची पानं वाचून पुरी होईतो ती थांबली असती; पण आपण फक्त इतकंच म्हणालो की, आता काम आहे. काल रात्रीही जरा धड दोन शब्द बोलायलाही आपण थांबलो नाही. असं का केलं? कुणाचं मन दुखवून काय साधणार आहे? इप्सिताच्या | </p> |

| | | |
|---|---|---|
| | वडिलांना आपण पाहिलं नाही, पण वयानं ते मोठेच असतील ना? त्यांना इथं यायला भाग पडावं हे काय चांगलं म्हणता येईल का? असं वागण्यात आपला छुपा अहंकार तर नसावा? का दुसरी काही भीती असावी?... स्त्रीची भीती, धनदौलतीची भीती. कदाचित अर्णवभाईच्या इच्छेविरुद्ध आडवं आडवं जाण्यातच मजा वाटत असावी. चला, जे असेल ते! एकदा त्या लोकांकडे जाऊन यायला पाहिजे. संसारात परत फिरल्यावर हे असले प्रतिबंध चालणार नाहीत. वेगवेगळे प्रसंग येतील, योगायोग येतील, वेगवेगळी माणसं भेटतील, त्या सगळ्यांमध्ये राहूनही आत्मचिंतनात निमग्न राहायचं आहे. आपण हे करू शकू? कदाचित पाय घसरून पडलो तर? या कर्दमभूमीत अलिप्त राहावं, हेच खरं नाही का? फ्रान्सिसच्या खोलीत त्याचा फाधर हॅरिस होऊन राहताना सहीसलामत राहता येत होतं. इथं धोका आहे. वर जाण्यात तर अजून धोका आहे. खाली झोके खात असलेल्या वडावरचे दोनचार पोपट एकदम आकाशात उडाले आणि निळ्याभोर आकाशात एक हिरवीशी रेघ ओढत परत झाडांच्या दाट पर्णराशीत लपून गेले. ते हालचाल करीत नसतील तेव्हा शोधणं अवघड होतं. लाल चोच दिसतेय. लाल फटाक्यासारखी दिसतेय. हिरवे पंख पानासारखे, पण फडफडल्याशिवाय राहत नाहीत. कदाचित लपूनछपून राहणं हे त्यांच्या जीवनाचं ध्येयही नाही. | |
| <p> | हे नवंच संकट आलं, फ्रान्सिस असली काही हरकत घेईल हे काही ध्यानात नव्हतं आलं. तरीपण मग लटकंच हसत तिनं म्हटलं, ‘अच्छा शामतक तो रख्खो. पिछे नॅन्सी बेबी आएगा तो कुछ न कुछ ठिकाणा करेगा.’ | </p> |
| <p> | ‘मतलब मेमसाब?’ | </p> |
| <p> | ‘अरे व्यवस्था - क्या बोलता है, इन्तजार करेगा.’ | </p> |
| <p> | ‘किसका?’ | </p> |
| <p> | ‘वो वाला नहीं... वो दुसरा... हां, इन्तजाम.’ | </p> |
| <p> | ‘ठीक है. साबका भाई है न?’ | </p> |
| <p> | ‘हा रे. एकदम सग्गा!’ | </p> |
| <p> | ‘अच्छा.’ | </p> |
| <p> | शाल्मलीचा निरोप घेऊन फ्रान्सिस आत गेला. तेव्हा ईशान शांतपणांन जप करत होता. चित्तवृत्ती ज्या त्या इंद्रियाद्वारे बाह्य विषयांना स्पर्श करतात, तेव्हाच सुखदुःखांचा अनुभव येतो ह्या शास्त्रवचनाची त्याला आज प्रत्यक्ष प्रचिती आली होती. नासिका तीच होती, दुर्गंध तोच होता, पण मनाला दुर्गंधीचा अनुभव येत नव्हता. कारण या दोहोंतला संबंध तुटून गेला होता. ईशानच्या चेहऱ्यावर भूक, तहान, थकवा या कशाची एक रेषही उमटलेली दिसत नव्हती. एक निर्मळ तेज चेहऱ्यावर फाकलं होतं. | </p> |
| <p> | फ्रान्सिसचे पाय दरवाजातच थबकले. त्याला जणू काही आपण गोव्यातच आहोत असं वाटलं. सहासात वर्षांचा. आणि त्याच्यासमोर फादर हेरिस बसले आहेत. लहानपणी त्याला या फादरचं जबरदस्त आकर्षण होतं. त्यांची बदली झाली नसती तर फ्रान्सिस चर्चलाच शरण गेला असता. त्यानंतरही अनेक वर्षं फादर हेरिस त्याच्या स्वप्नात येत होते. अलीकडे बऱ्याच दिवसांपासून त्यांना असं स्वप्नातही बघितलं नव्हतं; का त्यानं त्यांची आठवणही काढली नव्हती. आज ते कृपाळू होत आपणहून इथं आले आहेत. त्याच्या या लहानशा | </p> |

| | | |
|---|---|---|
| | खोलीत बसले आहेत. जिझसशी बोलताहेत. आपल्या छातीवर क्रॉसची खूण करीत तो हलक्या पावलानं आत आला आणि ईशानजवळ बसला. | |
| <p> | खूप वेळानंतर ईशानचे डोळे उघडले आणि त्या घाणेरड्या खोलीत श्रद्धेचं सुंदर कमळ उमललेलं त्याला दिसलं. कोण होता हा? सोमगिरींना स्पर्श करायचा त्याच भावानं समोर बसलेल्या व्यक्तीच्या खांद्यावर हात ठेवत त्यानं त्याला विचारलं, ‘भाई कोण आहात तुम्ही?’ | </p> |
| <p> | ईशानला वाटलं की, तो एका बेटावर फेकला गेलाय. त्या बेटाच्या आसपास नजर टाकायला कुठलंही साधन नव्हतं. निरंग, निश्चळ महाजलनिधी त्याच्यासारख्याच नील-श्वेत क्षितिजाला कुठं स्पर्श करतो आहे, तेही समजत नाही. त्याच्या मधोमध आहे या स्वयंभू प्रकाशानं दीप्तिमान होणारं हिमद्वीप. त्यावर तो उभा आहे. एकटा, एकाकी. कुठंही जीवनाचा कसलाही संचार नाही. सगळंच निःस्तब्ध, शांत - कशाची तरी वाट पाहत. इथं श्वास घेणंही एक अपराध वाटतो. देवाच्या या महालयाच्या अपूर्व रचनेसमोर दृष्टी भिडली म्हणजे परत पाठीमागे वळू शकत नाही. ती त्यातच विलीन होऊन जाते. धन्यतेच्या या क्षणी एका अज्ञात भीतीचा स्पर्ष झाला आणि ईशान, रजतच्या त्या दालनात, इंद्रयगम्य दृश्य जगतात परत आला. | </p> |
| <p> | पुष्कळ माणसं होती. रजत स्वतः, इप्सिता, निरंजनभाई, डॉक्टर मार्शल, नर्स, अजून इतर दोनतीन नोकर. सगळे हळूहळू आवाजात बोलत होते, पण आता ईशानला नजरेचेही ओझे झाले होते. कुणी काही विचारण्याआधीच तो उठला आणि हळूच म्हणाला, ‘मला फार थकवा वाटतोय.’ मग कुणाकडं बघितल्याशिवाय तो बाहेर पडला. पाय आपले आपण चालत होते. आपले आपणच थांबले. | </p> |
| <p> | शिथिल झालेल्या शरीरानं ईशान पलंगाच्या कडेवर बसला. काय झालं हे सगळं? कर्तृत्वाच्या अहंकारानं शेवटी त्याला दंश केलाच का? रजत बरा व्हायचा होता तर असाच नसता झाला? आपण मध्यस्थी करायची कसलीच गरज नव्हती. कशासाठी त्यानं रजतच्या बुडत जाऊ पाहणाऱ्या चेतनेला जोरजोरानं जागं केलं? ब्रह्मज्ञान मिळविण्याचं प्रलोभन देत त्यानं रजतला परत फिरवलं, ते ब्रह्मज्ञान कुणाला देऊ करण्याएवढं आपल्या स्वतःला तरी झालंय का? डोळ्यांतून पाणी ओघळलं. मेंदू तर ठार बहिरा झाला होता, पण हृदय वाहायला लागलं. या पश्चात्तापात किती वेळ निघून गेला, त्याच भानच उरलं नाही. अचानक मावळत्या सूर्याचा एखादा किरण खिडकीच्या काचेला घसटून, ईशानच्या चेहऱ्यावर कुणी दोस्तानं टपली मारावी तसा पडला. खिडकीच्या बाहेर त्याचं लक्ष गेलं तर आकाशाच्या विशाल पार्श्वभूमीवर थोडेसे लहान लहान मेघश्याम ढग निरुद्देशानं सहलीसाठी मजेत इतस्ततः फिरत होते. आकार, भार, वर्ण या कशाचीही तमा नाहीये. बस, आपल्या लहरीत तरंगताहेत. राहतील तोवर राहतील, मग बस, विखुरतील. या ढगांना पाहताना फार बरं वाटलं. मनातल्या मनात जणू काही हसू आलं. | </p> |
| <p> | हे सगळे विधी संपल्यावर एक जण म्हणाला, ‘स्वामीजी! संध्याकाळी आपण माझ्याकडं पाचारण करावं.’ | </p> |
| <p> | ‘कशासाठी?’ | </p> |
| <p> | ‘माझी पत्नी सहा वर्षांपासून अंथरूणाला खिळून आहे. आपली कृपा झाली तर तीही बरी | </p> |

| | | |
|---|---|---|
| | होईल.’ | |
| <p> | ‘भगवंताची कृपा.’ | </p> |
| <p> | ‘आम्ही आपल्यालाच ओळखतो, भगवंताला शोधायला कुठं जावं?’ | </p> |
| <p> | ईशाननं उत्तर द्यायच्या आधीच दुसर कुणी म्हणालं, ‘आपण प्रसाद द्यावा, बाबा! माझ्या मुलीचं कल्याण व्हावं असा आशीर्वाद द्या. मी तिला प्रसाद खाऊ घालतो. मला खात्री आहे, तिचं सगळं काही सुरळीत होईल.’ | </p> |
| <p> | एका महिलेनं तर आपल्या पतीच्या जोडीनं खाली वाकून चरणस्पर्श करून घेतलाच, ‘आमच्या फार्म हाऊसवर एकदा आपली चरणकमलं पडू द्यात, महाराज! जेव्हा अनुकूल असेल तेव्हा आम्ही घेण्यासाठी येऊ. हो, ना भगीरथ?’ | </p> |
| <p> | भगीरथनं जाड सिल्कचा सूट घातला होता. खाली वाकून नमस्कार करताना ते अवघडले होते. पत्नीच्या आग्रहामुळंच ते इथं आले होते, हे लक्षात येत होतं; आणि तिच्या इच्छेविरुद्ध जाण्याची त्यांच्यात हिंमत नव्हती. त्यांनी आपल्या घोगऱ्या आवाजात म्हटलं, ‘हा बाबाजी! निरंजनभाईपण बरोबर येतील. काय निरंजनभाई?’ | </p> |
| <p> | निरंजनभाईंनी जरासा उबग येऊन म्हटलं, ‘ते सगळं कसं जमतं, ते नंतर बघू या. आतातरी बाबानां आराम करू दे.’ | </p> |
| <p> | सगळी माणसं सज्जन आणि संस्कारी होती. लगेच ती भराभर बाजूला झाली; पण एकानं हात जोडून म्हटलं, ‘बापू! दोन उपदेशाचे शब्द नाही सांगणार?’ | </p> |
| <p> | ईशान विचारात पडला. अशा रीतीनं अनोळखी माणसांसमोर तो कधी बोलला नव्हता. कुणाकडून शास्त्राभ्यास करवून घेणं, हे वेगळं, पण इतक्या सगळ्या वेगवेगळ्या प्रकृतीच्या, स्वभावाच्या माणसांना एकाएकी उपदेश कसा करायचा? नाही तरी कसं म्हणायचं? एकाएकी त्याला सुचलं, ‘चला आपण प्रार्थना करू या.’ मग संस्कृतचे दोनचार श्लोक म्हणून त्यानं एक धून उचलली. | </p> |
| <p> | बरंय, ती रडू शकते आहे ते. जाता जाता ईशानच्या मनात विचार आला. बाकी, या बापाचा चेहरा तर एकदम उजाड, भकास झालाय. प्रलयकाळाच्या सुरुवातीला दूर क्षितिजाच्या रेखेवर दिसणाऱ्या काळ्या ढगांसारखा काळाकुट अंगठा.... ओ! त्याला विसरणं मुश्कील आहे... केव्हा पुढं वाढत जाऊन या समस्त गगनाचा ग्रास करील ते सांगता नाही यायचं. | </p> |
| <p> | इप्सिताच्या रूममध्ये ईशाननं याआधी कधी पाऊल टाकलं नव्हतं. खोलीत सगळीकडे धुकं पसरलं असावं अशी पांढरट राखाडी रंगाची रंगसंगती केली होती. त्यात एका बाजूला भपकेदार जिल्हई चढवलेले दोन उंच पुतळ्यासारखे पितळेचे दिवे होते, आणि त्या दिव्यांमधून उजळलेल्या फडफडत्या ज्योतीच्या प्रकाशप्रवाहात नाहत होती दुर्गेची अतीव मनोहारी प्रतिमा! तिचं सान्निध्य सतत सहन करायलाही शक्ती हवी... ईशाननं आदरानं जरा इप्सिताकडं पाहिलं. पण ती पार ढासळली होती. रजतच्या डोळ्यांसारख्याच या दोन सुंदर डोळ्यांतून अविरत ओघळणाऱ्या अश्रूप्रवाहात या देहाचं संपूर्ण चैतन्य वाहून गेलंय.... तिच्याकडं पाहिलं की मन थरकापतं. | </p> |
| <p> | अपार ममतेन इप्सिताच्या माथ्यावर आपले दोन्ही हात ठेवत ईशान म्हणाला, ‘ऊठ इप्सिता! रजतला तुझी गरज आहे, ऊठ तोंड धुऊन घे.’ | </p> |
| <p> | किंचितही खळखळ न करता इप्सिता उठली आणि तोंड हात पाय धुऊन ईशानकडं आली. | </p> |

| | | |
|---|---|---|
| | लहान मुलांसारखं तिनं विचारलं, ‘आता काय करू बाबा?’ | |
| <p> | ‘पाणी पिऊन घे. अन् रजतकडं जा. तो योगवसिष्ठ वाचतोय, त्याबद्दल त्याच्याशी चर्चा कर.’ | </p> |
| <p> | ‘पण.... त्याचा अंगठा....’ बोलता बोलता परत तिच्या डोळ्यात पाणी आलं. | </p> |
| <p> | ‘रडण्यानं अंगठा बरा होतो का, इप्सिता! तू त्याच्यावळ जा.’ | </p> |
| <p> | ‘जी,’ असं म्हणून इप्सिता निघाली. | </p> |
| <p> | ‘तुम्ही जसं म्हणाल तसं!’ | </p> |
| <p> | दुर्गेच्या प्रतिमेला हात जोडून ईशानही त्यांच्याबरोबर बाहेर पडला. रजतचा अंगठा, इप्सिताचे अश्रु, निरंजनभाईंची चिंता या सगळ्यांच्या भारानं त्यांचं चित्त झाकोळून गेलं होतं. सगळ्यात पहिल्यांदा भेट, मग परिचय, मग आत्मीयता, मग आसक्ती..... अभिमन्यूसारखं आत शिरणं तर सोपं आहो या सगळ्या चक्रव्यूहात, पण बाहेर पडायची विद्या नसेल तर शेवटी षट्रीपूंच्या हातून मरायचं; हे पण नक्कीच! दुनियेत लाखो-करोडों कुटुंब जगतात. प्रत्येकाच्या घरात दुःखाचा एखादा तरी दिवा पेटलेला असतोच. त्यानं का नाही डोळे अंधारून जात? हृदयात का नाही जखमा होत? ईशाननं मन प्रयत्नपूर्वक सावरलं आणि चालता चालता इष्ट मंत्राचा जप करायला सुरुवात केली. अजून सोमगिरीचं म्हणणं काय आहे ते ऐकायचंय - या सगळ्यांचं नंतर बघता येईल. कदाचित डॉ. मार्शलना भेटावं लागेल - काय म्हणतील ते? आपल्यालाही काहीतरी उत्तर द्यावं लागेल... काय करावं? | </p> |
| <p> | ‘आणि कुणी सांगितलं की ते इथं आहेत?’ | </p> |
| <p> | रजतचे डोळे एकदम विस्फारले. घाबरून जात तो म्हणाला, ‘माझी अशी मस्करी नका करू, बाबा! मला अजून तुमच्याकडनं कितीतरी शिकायचं बाकी आहे! तुम्हीच सांगत होतात ना, की ब्रह्म जाणल्याशिवाय देह ठेवू नये. मग मला असं टाकून जायची भाषा का करता आहात?’ | </p> |
| <p> | ‘मी म्हणजे ब्रह्म नाही, रजत! माझ्या राहण्यानं का जाण्यानं काय फरक पडतो?’ | </p> |
| <p> | ‘पडत कसा नाही, बाबा? तुम्ही माझं सर्वस्व आहात,’ असं म्हणता म्हणता, रजतच्या डोळ्यातून पाण्याची धार ओघळली. हळुवारपणानं ती पुसून टाकत, ईशाननं त्याच्या डोक्यावरनं अतीव मायेनं हात फिरवला. | </p> |
| <p> | ‘शांत हो रजत! ब्रह्मज्ञान होणयासाठी कुणा व्यक्तीच्या प्रत्यक्ष अस्तित्वाची गरज नाही. वाचन, विचार, जप, तप, भजन, कीर्तन, ध्यान, सेवापूजा सगळं आपण आपलंच केलं पाहिजे. गुरूकृपा, इष्टकृपा, मंत्रकृपा, ग्रंथकृपा यापैकी कोणतीही एक झाली, तरी त्यानं अंतराची द्वारं उघडतात. मार्ग दिसू लागतो. पण चालायचं आहे स्वतःलाच! तू तुझा चालत राहा. पोहोचता येईलच. थांबू नकोस. अटकू नकोस. इकडेतिकडे नको जाऊ. पोहोचशील, जरूर पोहोचशील बेटा! ईशानबाबांशी आता तुझं कही काम उरलं नाही.’ | </p> |
| <p> | ‘नाही... असं नका बोलू. तुम्हाला माहित्येय, त्या वेळेस मला तुमच्या एकट्याचाच आवाज एकू येत होता. तुम्ही म्हणत होता - अथातो ब्रह्मजिज्ञासा - आता मला ब्रह्मज्ञान झाल्याशिवाय तुम्ही जायचं नाही, बाबा.’ | </p> |
| <p> | ‘कोण जातं आणि कोण येतं रजत? ओमकारबाबांनी देह ठेवला, पण सदैव, नित्य, जेथे | </p> |

| | | |
|---|---|---|
| | जातो तेथे ते माझे सांगाती असतात - अंतरात. स्थूल देहाची माया ती काय? तूच आता इप्सुला रडवलं होतंस ना, ते विसरलास? आता परत तूच हिमंत हारतोयस?’ | |
| <p> | ‘चुकलं माझं, तिला बोलवा, आताच्या आता बोलवा.’ | </p> |
| <p> | ‘इप्सिता!’ ईशाननं दरवाजाच्या बाहेर जाऊन हाक मारली. थोड्या वेळानं डोळे पुसत पुसत ती तिथं आली. ईशानजवळ जरासं घुटमळत अश्रूभिजल्या आवाजात़ ती म्हणाली, ‘बाबा! रजत स्वित्झर्लंडला जायचं नाही म्हणतोय.’ | </p> |
| <p> | ‘आता नाही म्हणणार.’ | </p> |
| <p> | ‘वा! तुम्ही पण येता ना, बाबा?’ | </p> |
| <p> | ‘तू आत जा. तो तुझी वाट पाहतोय.’ असं म्हणून ईशान तिथून निघाला आणि सरळ निरंजनभाईंकडं जाऊन म्हणाला, ‘चिंता करू नका. रजत डॉक्टरांचं सांगणं ऐकेल. ’ | </p> |
| <p> | ‘तुम्ही पण आमच्याबरोबर चला. देश फार निसर्गमनोहर आहे. पाहण्यासारखा आहे.’ | </p> |
| <p> | ‘वसुंधरेची कोणती कडीकपारी पाहण्याजोगी नाहीये? आपण मात्र आहोत तिथंच ठीकंय. मला माफ करा!’ | </p> |
| <p> | ‘तर मग दुसरी एक विनंती मानावी लागेल. आम्ही स्वित्झलंडहून परत येईतो, तुम्ही इथंच राहा. ऑफीसची दोन माणसं सकाळ-संध्याकाळ फेऱ्या घालून जातील. तुमची कसलीही गैरसोय होणार नाही.’ | </p> |

</body></text>
</Doc>